PANDIT CENTRE FOR FUNDAMENTAL RESEARCH
Date
ESTD. 19

# कथा कुणाची, व्यथा कुणा-

गो. गं. पारखी

रामकृष्ण बुक डेपो, गिरगांव, मुंबई ४.

प्रकाशक : प्र. म. टिळक, त्रिदल प्रकाशन,
द्वारा : रामकृष्ण बुक डेपो, गिरगांव–मुंबई ४.

प्रथमावृत्ति : जानेवारी १९६५

अडीच रुपये
मूल्य २॥ रुपये
त्रिदल प्रकाशन

मुद्रक : वि. ह. पटवर्धन, जयभारत मुद्रणालय,
५५१ बुधवार, पुणें २.

कॉपीराईट : सौ. मालती पारखी

---

जाणीव—या नाटकाचे संपूर्ण हक्क सौ. मालती पारखी ५८० शनवार, कन्याशाळेजवळ, पुणें २. यांचेकडे सुरक्षित असून त्यांच्या लेखी संमती-विना या नाटकाचा प्रयोग, रूपांतर, भाषांतर चित्रीकरण किंवा अन्य कोणत्याहि कारणा-साठीं उपयोग केल्यास कायदेशीर उपाय-योजना केली जाईल.

—मो. मं. पारखी

मित्रद्वय
तात्या मराठे
व
राजा नातू
यांसी.

## गो. गं. पारखी

सप्तपदी, (कथासंग्रह)
( चित्रपट कथा 'पाहूं रे किती वाट ?)

सांगते ऐका, (ग्रामीण कादंबरी)
(चित्रपट कथा 'सांगत्ये ऐका')

कांचेचें घर, (नाटक)

अक्षांश रेखांश (नाटक)
(राज्य सरकारनें पारितोषिक देवून गौरविलेलें)

व्याह्यानं धाडलं घोडं (एकांकिका)

कोरीव लेणी (नाटक)
(सकाळ नाटय वाङमय समितीनें पहिलें पारितोषिक दिलेलें)

बन्सीभैय्या (कादंबरी)
(मुंबई मराठी ग्रंथ संग्रहालयानें पारितोषिक दिलेली)

भातुकली (पुरुषपात्र विरहित नाटक)

कथा कुणाची व्यथा कुणा,-- (नाटक)

संकल्प

कम्बोली (कादंबरी)

आणि एक नाटक ? ?

# १

(पडदा उघडतो त्यावेळीं समोर दिसते ती अरविंद साने यांच्या घरांतील प्रमुख बैठकीची खोली. रेल्वे-स्टेशनच्या नजीक असलेल्या, एका आलिशान बंगल्यांतील एका कडेच्या दोन तीन खोल्यांत अरविंद साने यांचं बिऱ्हाड सामावून घेतलं आहे. नाटकासाठीं उपयोगांत येणार आहे ती एकच प्रमुख बैठकीची खोली.

प्रेक्षकांच्या समोर मागील भिंतींत प्रेक्षकांच्या उजव्या हाताकडे सरकलेलं असं एकच प्रवेशद्वार आहे. उरलेल्या भिंतींत प्रेक्षकांच्या डावीकडे भिंतींत लांबशी खिडकी आहे. मागें व्हरांडा. त्यामागें बाग, आकाश वगैरे दिसावं.

नाटकाचा हा जो प्रकार आहे त्यांत 'कॉरनरिंग' हा भाग अभिप्रेत असल्यानें मागील भिंतीचा प्रेक्षकाच्या डावीकडील कोपरा खूप आंत व उजवीकडील कोपरा खूप पुढें अशी तिरकस रंगमंचाची मांडणी केल्यास ती जास्त श्रेयस्कर ठरेल.

प्रेक्षकांच्या उजवीकडे स्वयंपाकघर, बाथरूम वगैरेकडे जाणारा मार्ग व प्रेक्षकांच्या डावीकडे बेडरूमचें दार. हें दार पुढील बाजूस प्रेक्षकांकडे सरकलेलं असावं.

रंगभूमीवरील वस्तु मोजक्याच आहेत. एक प्रमुख लांबट बैठक बेडरूमच्या दारापासून आंत प्रेक्षकांच्या डाव्या भिंतींलगत. त्याला काटकोनांत दोन छोटया बैठकी. प्रमुख बैठक ज्या तऱ्हेची असेल त्यास सुसंगत या बैठकी असाव्यात. एक लहानसं टीपॉय. बेडरूमच्या दारालगत एक टेबल.त्यावर योजनापूर्वक मांडलेलं साहित्य,टेलिफोन, मागें भिंतीशीं एक कपाट, त्यांत पुस्तकं व श्री. साने यांना लग्नप्रसंगीं आलेल्या वेचक भेटी. दारा-खिडक्यांवर पडदे वगैरे नेहमींचं आहेच.

पडदा उघडतो त्यावेळीं रंगभूमीवर कोणीहि नाहीं. दार व खिडकी बंद आहे. सकाळचा मंद प्रकाश रंगभूमीवर आहे. मागील बाजूनें एक आगगाडी गेल्याचा आवाज येतो. आंतल्या स्वयंपाक–घरांच्या भागांत मुग्धा (वय सुमारे पंचवीस) काम करतां करतां थांबत थांबत गुणगुणाव तसं एक गाणं गुणगुणते आहे.

कांहीं वेळानें बेडरूममधून अरविंद साने (वय सुमारे अठ्ठावीस) बाहेर येतो व मुग्धाचं गुणगुणणं ऐकून थबकतो. टेबलावर पडलेल्या सिगारेटच्या पाकिटांतील एक सिगारेट काढून शिलगावतो व प्रसन्न-पणें आळस देत खिडकीशीं जाऊन खिडकी उघडून बाहेर बघतो. मुग्धाचं गुणगुणणं चालूच आहे. तिकडे कान देऊन ऐकत तो बैठकी-वर आळसटल्यासारखा बसतो व हांक मारतो. )

अरविंद : मुग्धा ऽऽ ( तिचं गुणगुणणं पुन्हां ऐकूं येतं. अरविंद पुन्हा हांक मारतो. ) मुग्धा ऽऽ!

( मुग्धा बाहेर येते. ती कुठेंतरी बाहेर जाण्याच्या तयारींत आहे. तिनं कपडे बदलले आहेत. केसांच्या शेंडयाला रिबन बांधतां बांधतां ती बाहेर येते व आळसटून बसलेल्या अरविंदला विचारते. )

मुग्धा : हें काय ? उठायचं नाहीं अजून ?

अरविंद : म्हणजे...अग, मी जागाच आहे कीं...

मुग्धा : तें दिसतं...पण अंथरुणातनं उठून आलांत ते इथं काय बसलायत! कांहीं उद्योग नाहींत वाटतं आज ?

अरविंद : उद्योग काय भरपूर आहेत ग. पण कंटाळा आला बुवा आज.



( आळस देत तिच्याकडे लोभस नजरेनं बघत ) ए...इकडे ये कीं.

मुग्धा : ( समजलं अशा अर्थी ) हुं ऽऽ पुरे आतां उठा. अंबरनाथ लोकल-सुद्धां गेली. म्हटलं सव्वासात वाजलेत उठा.

अरविंद : चहा झालाय का ? (आतां तिच्या रिबन्स् बांधून झाल्या आहेत. पर्स आणण्यासाठीं ती आंत निघाली आहे. एकूण ती गडबडींतच आहे. )

मुग्धा : ( बेडरूमकडे जात ) माझा झालाय्.

अरविंद : अन् माझा चहा ?

मुग्धा : ( आंतूनच ) तुम्हांला शिळया दुधाचा चहा आवडत नाहीं ना– ( पर्स घेऊन टेबलाशी येते व पर्स भरूं लागते. )

अरविंद : काय म्हणालीस ?

मुग्धा : म्हटलं तुम्हांला शिळया दुधाचा चहा आवडत नाहीं ना ? ( ती आपल्या कामांतच आहे. )

अरविंद : ( लटकं ) काय म्हणालीस कांहीं ऐकूं आलं नाहीं बघ. जरा इकडे येऊन सांग ना.

मुग्धा : ( त्याच्याकडे लटक्या रागानं बघत ) हें बघा, म्हटलं आतां रात्र संपलीय्. दिवस उजाडलाय. उठा. ( बोलतां बोलतां पुढें जाऊन खिडकीवरचा पडदा दूर करते.)

अरविंद : छट् ! चहा झाला नाहीं तोंवर मुळीं उजाडतच नाहीं.

मुग्धा : (दरवाज्याशीं जात दरवाजा उघडीत) मग आलांत तरी कशाला अंथरुणातनं उठून ? जा लोळा हवंतर आणखीन. गवळी आला कीं उठवतें.

(स्वयंपाकघराकडे जायला निघते तोंच रत्ना येते. रत्ना वय सुमारे २८ )

अरविंद : (रत्नाला) या बाईसाहेब...

मुग्धा : (मागें वळून बघत) रत्ने, किती ग उशीर ? ही काय कामाला यायची वेळ वाटतं ? दवाखान्यांत जायचंय् तर खोळंबलेय् तुझ्यासाठीं.

रत्ना : ( खोटया काळजीच्या स्वरांत ) दवाखान्यांत जायचंय्–कुणाला–तुम्हांला ?

मुग्धा : हुं ऽऽ पुरे आतां तो सासरपेरा. चला, कामाला लागा. ती कपबशी पडलीय् तिथं टेबलावर ती उचल. चहाचीं भांडीं आवर. आटप लवकर.

(वळून पुन्हां बेडरूमकडे जाते. रत्ना स्वयंपाकघरांत जाते. बेडरूममधून हात-रुमालाची घडी करीत मुग्धा स्वयंपाकघरांतून वृत्तपत्रांची घडी करीत रत्ना एकदम बाहेर येतात. मुग्धा टेबलावरची पर्स हातीं घेते आणि रत्नाला म्हणते)

मुग्धा : आणि हें बघ–

रत्ना : ( थबकत ) काय ?

मुग्धा : स्टोव्हवर पाणी ठेवलंय्. तेवढा गवळी आला कीं त्यांना चहा तयार करून दे.

रत्ना : ( वृत्तपत्रें कपाटावर ठवीत ) म्हणजे साहेबांचा चहा झाला नाहीं अजून ?

मुग्धा : अग आत्तांशीं तर उठलेत.

रत्ना : ( अरविंदकडे बघत ) हो !

अरविंद : छे: अग, तिचं काय ऐकतेयस्. पहांटेच उठून फिरून आलोंय् मी.

मुग्धा : हो स्वप्नांत. ( रत्ना हासते ) हें बघ रत्ने, तू आतां हंसत बसूं नकोस. आटप लवकर. आत्तां ऑफिसची वेळ होईल. मी पटकन् जाऊन येतें दवाखान्यांत. डॉक्टर आले असतील आतां. लवकर गेलं कीं पटकन् परत येतां येईल.

रत्ना : ( अडखळत ) पण–म्हणजे ..तुम्हांला बरं नाहीं बाई !

मुग्धा : ( त्रासिकपणें ) एकदां माझ्याकडे बघ बरं. ( रत्ना बघते ) वाटतंय् का तुला मला कांहीं होतंय् म्हणून ?

रत्ना : ( नकारार्थी मान हालवीत ) पर मग दवा कुनाला ?

मुग्धा : तरीहि मलाच. कारण मला बरं नाहीं असं यांना वाटतंय्. जरा कुठें थकल्यासारखं वाटलं किंवा कसंसंच वाटतंय् म्हटलं कीं लगेच लाग-लाच यांचा लकडा मागें. डॉक्टरकडे जा, डॉक्टरकडे जा म्हणून. पुन्हां नाहीं म्हणायची सोय नाहीं. लगेच डोक्यांत राख घालून संन्यास घ्यायची तयारी. ( रत्ना कौतुकानं हांसत आंत जाते.)

अरविंद : मुग्धे, मी ऐकतोंय बरंका.

मुग्धा : तुम्हीं ऐकावंत म्हणूनच बोलतेंय. ( निघाली आहे ) हे बघा, मी दवाखान्यांत निघालें आहें. चहा तयारच आहे. गवळी आला कीं रत्ना देईल चहा आणून– ( तोंच दारीं गवळी येतो. )



गवळी : ( कॅन आपटीत ओरडतो ) दूऽऽध !

मुग्धा : शंभर वर्षें आयुष्य आहे तुम्हांला भैय्याजी. (हांक मारते) रत्ने– ( थोडं थांबत, रत्ना ओ देत नाहीं असं पाहून स्वत:च पातेलं आणायला आंत जाते. )

अरविंद : ( उठून दाराशीं येत ) जयरामजी भैय्याजी.

गवळी : अजी जयरामजी की बाबूजी. ( मुग्धा पातेलं घेऊन येते व थांबते. भैय्या दूध घालूं लागतो. )

अरविंद : आज बहोत जलदी किया भैय्याजी ?

गवळी : ( दूध घालतां घालतां ) अरे काहे की जलदी बाबूजी–बिस गाडीने बहोत तंग किया है. ( दूध घालणं संपतं. मुग्धाच्या हातांत तो पातेलं देतो. मुग्धा आंत जाते. भैय्या निघून जातो. अरविंद दारांतच उभा. )

मुग्धा : ( बाहेर येत, जायला निघत. ) बरं मी जाऊन येतें हं.

अरविंद : ( दरवाजांत हात अडवीत ) अऽऽहंऽऽ

मुग्धा : ( आश्चर्यानं ) हें काय ?

अरविंद : आम्हांला चहा हवाय्.

मुग्धा : अहो, मग रत्ना देतेय न–तेंच चाललंय.

अरविंद : ( लाडांत ) अंहं ! आम्हांला रत्नाच्या हातचा चहा नको. ( तिच्या खांद्यावर हात ठेवीत ) आम्हांला चहा या हातचा हवाय.

मुग्धा : (लटक्या रागानं त्याचा हात झिडकारीत) अस्से आहांत अगदीं. ( पर्स कपाटावर ठेवीत आंत जाते. )

अरविंद : ( कपाटाकडे येतो. त्याचं लक्ष वृत्तपत्राकडे जातं. तो एक वर्त-मानपत्र हातांत घेत चाळतो व मथळे वाचूं लागतो. ) भारताचा पाक-कडे निषेध खलिता–छान, छान चालू द्या. ( पान उलटतो ) विधान-सभेवर कामगारांचा जंगी मोर्चा–( हात उंच करीत ) झालाच पाहिजे. (. पुढें नजर सरकवीत ) सीमाप्रश्न चिघळला–वाचकांचा पत्रव्यवहार–आजचें भविष्य–रेडिओ कार्यक्रम–हः! हे वृत्तपत्रवाले लेकाचे त्याच त्याच बातम्या आलटून पालटून नव्या कागदावर छापून आमच्या बोकांडीं का मारतात समजत नाहीं–( पान उलटतो व बघतो. )

मुग्धा : ( आंतूनच ) चहा तयार आहे हो.
अरविंद : मग आण ना. मीहि तयार आहे.
मुग्धा : ( बाहेर येत ) आण ना काय. कांहीं तोंड बिंड तरी धुवायचंय् का नाहीं ?
अरविंद : (वृत्तपत्रें ठेवीत) अरे, खरंच कीं ! (आंत निघाला आहे परंतु मुग्धापर्यंत येऊन थबकतो ) नाहीं तर जाऊं दे–कंटाळा आला बुवा–धुईन मागाहून–( तिच्या कानाशीं ) आणि नाहीं तरी मला वाटतं माझं तोंड रात्रभर झाकूनच ठेवलेलं होतं नाहीं ?
मुग्धा : ( थोडं दूर सरत ) आतां पुरे बरं का चावटपणा. ती रत्ना आहे आंत.
अरविंद : मग असेना. हें बघ, ए ऽऽत्या रत्नाबित्नाची भीति मला नको घालूस हं. तुझ्यावर प्रेम करायला तुझ्या त्या कर्दनकाळ बापाला भ्यालों नाहीं तें काय असल्या रत्नाबिल्लाला भितों काय. वा: !
मुग्धा : हो हो, माहीत आहे ना ! म्हणे तुझ्या बापाला भ्यालों नाहीं. आठवा आठवा जरा ते दिवस. नुसतं म्हटलं एकदां अण्णांना विचारा, तर हिंमत झाली नाहीं. भागुबाई !
अरविंद : कोण भित्रा मी ?–अरे हाड्–चांगलं त्यांच्या नाकावर टिच्चून लग्न केलंय तुझ्याशीं.
मुग्धा : हो केलंत ना. लग्न कसं केलंत तें मलाहि माहीत आहे म्हटलं. भीत भीत, लपतछपत चोरासारखे तर आलां होतांत रजिस्टर्ड कचेरींत.
अरविंद : का फार तोंड सुटलंय. एकदा दाखवूं का भिगा–
मुग्धा : हूं, पिंगा घालायला मला आतां वेळ नाहींय ( रत्ना चहाचा कप अन् ट्रे आणते त्यामुळें तो तिचा पिच्छा सोडतो. मुग्धा तो टेबलावर ठेवीत ) घ्या. मी जाऊन येतें डॉक्टरकडे. ( रत्ना आंत जाते. )
अरविंद ( झटकून टाकीत ) ए ऽऽ काय ग उठल्यापासून डॉक्टर डॉक्टर लावलयंस. इथं शेजारच्या बंगल्यांत तर दवाखाना. दोन मिनिटांचं काम पण त्यासाठीं तयारी चाललीय् मात्र दोन तास. वेंगट कुठली. चल बैस इथं ( तिला आणून बसवतोच. ) म्हणे डॉक्टरकडे जाते, अग काय मस्त सकाळ आहे ! समोर चहाचा गुलाबी पेला वाफाळून पडलाय्. मस्त सिगा-



रेट तुझ्याकडे बघून कशी आपल्याशींच जळते आहे. खेटून बसायला, गुलुगुलु बोलायला, खुदुखुदु हासायला कसं छान वातावरण आहे, अन म्हणे मी जातें डॉक्टरकडे...अरसिक कुठली.
मुग्धा : ( लटका राग ) बरं असू द्या हं मी अरसिक. मी अरसिक होतें तर कशाला लग्न केलंत मग माझ्याशीं.
अरविंद : थोडंस चुकलंच. पण त्याचं काय झालं, म्हणजे, चुकून उसाला तोंड लागलं तर तो बेटा भलताच गोड लागला अन मग मुळासकट खावा लागला ग.
मुग्धा : ( उठत ) झोप झालीय भरपूर अन उद्योग नाहीं कांहीं. तेव्हां सुचतंय् काव्य तुम्हांला. मला नाहीं आतां तें ऐकायला वेळ. मी जाऊन येते. ( पर्स उचलते, त्याला बजावीत. ) अन् तुम्हींसुद्धां उगाच बसू नका नुसते सिगारेटी फुंकीत, आढ्याकडे बघत. चहा घ्या अन् पाणी तापलंय् तर आंघोळ करून घ्या. आतां बाई येइल धुण्याची, समजलं ? ( निघाली आहे, दाराशी जाते तोंवर माळी– राघव ( वय सुमारे पंचेचाळीस ) आंत येतो. त्याच्या हातांत एक फुलांचा गुच्छ आहे. मुग्धा त्याला थांबवून त्यांतलं एक फुल तोडून घेते. अन् केसांत खोवत खोवत बाहेर जाते, माळी पुढें येतो. फुलांचा गुच्छ फुलदाणींत ठेवतो व फुलदाणी ठाकठीक करतो.
अरविंद : ( मागें गातो आहे, मोठ्यांदा, तालासुरांत ) नच सुंदरी करूं कोपा मजवरी करी अनुकंपा...नच सुंदरी ( रत्ना कांहीं कामासाठीं बाहेर येते अन अरविंदचं गाणं ऐकून तिला हांसूच येतं...तिला हासतांना तो पहातो अन हांक मारतो. ) रत्ने–
रत्ना : ( परततांना थांबत ) काय ?
अरविंद : हंसलीस कां ?
रत्ना : ( सावरीत ) छे: कुठें ?
अरविंद : असं काय ? माझ्या गाण्याला हसलीस ना ?
रत्ना : नाहीं बाई. ( आंत जायला निघाली आहे. )
अरविंद : रत्ने...
रत्ना : ( थबकत ) काय.